# दीड कोटी ग्राहक होणार वीजबिल मुक्त- फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारच्या पंतप्रधान सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार सौरऊर्जा योजना आखणार असून १०० युनिट पर्यंत वीज वापर असणारे राज्यातील ७० टक्के म्हणजे दीड कोटी ग्राहकांची वीजबिलातून मुक्तता होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. दरवर्षी विजेचे दर सरासरी ९ टक्क्यांनी वाढत असतात. मात्र यावेळी पहिल्यांदाच त्यात घट होणार आहे. १०० युनिटपर्यंतच्या ग्राहकांना २४ टक्क्यांची तर १०० ते ३०० युनिट वापरकर्त्यांना १७ टक्क्यांची वीजबील घटणार असल्याचेही त्यांनी सांगितले. याशिवाय राज्याची वीज कंपनी लवकरच स्टॉक मार्केटमध्ये सूचीबद्ध होणार असून कंपनी त्यातून पैसे उभारणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

काल विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी राज्याची विकासाची दिशा स्पष्ट केली. राज्याची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरपर्यंत न्यायची असेल तर राज्याला मोठया प्रमाणात विजेची गरज लागणार आहे. महाराष्ट्र हे देशाचे डेटा सेंटर कॅपिटल बनणार आहे. डेटा सेंटरला वीज हीच प्रामुख्याने लागणार आहे. त्यासाठी सर्व तयारी करण्यात आल्याचे सांगून देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून २० लाख घरे देण्यात येणार आहेत. ही सर्व घरे सौरऊर्जेने युक्त असतील. त्यामुळे या २० लाख घरांची विजबीलातून मुक्ती होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत कृषिपंप हे सौरऊर्जेवर चालतील. त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षाचे ३६५ दिवस ते ही दिवसा वीज मिळणार आहे. एकूण वीज खरेदीत सरकारची १० हजार कोटींची बचत होणार असून कार्बन उत्सर्जनात २५ टक्क्यांची कपात होणार आहे. २०३० सालापर्यंत ५२ टक्के वीज ही अपारंपारिक उर्जा स्त्रोतातून निर्मित करण्यात येणार आहे. घरगुती ग्राहकांनी देखील जर स्मार्ट मीटर बसविले तर पुढील पाच वर्षांत त्यांना दिवसा वापरलेल्या वीजेवर १० टक्के परतावा देण्यात येणार आहे. मात्र प्रीपेड मीटरची सक्ती अजिबात करण्यात येणार नाही. फक्त जो मागेल त्यालाच प्रीपेड मीटर देण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**नार–पार–गिरणा आणि वैनगंगा ते नळगंगा नदी जोड प्रकल्प**

महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी नार–पार–गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी मिळाली असून यामुळे नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा लाभ होणार आहे. हा प्रकल्प राज्यातील दुसरा मोठा नदीजोड प्रकल्प असून, यामुळे ४९,५१६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. विशेषतः कळवण, देवळा आणि मालेगावसह जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांना याचा फायदा होईल. तसेच वैनगंगा ते नळगंगा नदी जोड प्रकल्पांतर्गत ३१ नवीन धरणांचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच ४२६ किलोमीटरचा कालवा निर्माण करण्यात येणार आहे. या नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भाचे चित्र बदलणार असून प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विदर्भात दुष्काळ दिसणार नाही. तसेच यामुळे पाण्यावरून होणारे प्रादेशिक वाद उद्भवणार नाहीत. नदीजोड प्रकल्पांमुळे पाणीटंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळेल.

# चारचाकीची दोन दुचाकींना धडक; तिघे जखमी

## कल्याण महामार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाजवळील घटना

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** कल्याण महामार्गावरील रेल्वे उड्डाण पुलाजवळ एका चारचाकीने दोन दुचाकींना दिलेल्या धडकेत तिघे जखमी झाले आहेत. यातील एक गंभीर जखमी असून, तिघांवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघातात दोन्ही दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. चारचाकी वाहनाचा चालक अपघातानंतर पळून गेला आहे. वाहनात एक दारूची बाटलीही आढळून आल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

शुक्रवारी दुपारच्या सुमारास कल्याण महामार्गावर एका चारचाकी वाहनाने एका दुचाकीला समोरून जोराची धडक दिली. त्यावरील रमेश नारायण कार्ले व राजेश महादेव काकडे (रा. शाहूनगर, केडगाव) हे दोघे जखमी झाले. अपघातानंतर वाहन चालक कार घाईघाईने मागे घेत असताना त्याने दुसऱ्या दुचाकीला धडक दिली. यात एक जण गंभीर जखमी झाला आहे. तिघांनाही स्थानिक नागरिकांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर वाहन चालक पसार झाला आहे. नागरिकांनी चार चाकी वाहनाची पाहणी केली असता त्यात दारूची एक अर्धी रिकामी झालेली बाटली आढळून आली. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे अंमलदार घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहने पोलीस ठाण्यात आणण्यात आली आहेत. जखमींचा जबाब घेतल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# भोकरचे उपसरपंच सागर आहेर यांचा राजीनामा मंजूर



**भोकर (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर ग्रामपंचायतीतील सत्ताधारी माजी आमदार कानडे–करण ससाणे गटाचे सागर आहेर यांनी नुकताच उपसरपंच पदाचा राजीनामा मासिक बैठकीत सरपंच शितल पटारे यांना दिला. त्यांनी हा राजीनामा स्वीकारत मंजूर करून पुढील कारवाईसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे रवाना केला आहे.

भोकर ग्रामपंचायतीत २०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत परिवर्तन झाले. मुरकुटे गटाची सत्ता कानडे–ससाणे गटाच्या ताब्यात आलेली आहे. येथे असलेल्या १५ सदस्य संख्येत माजी आमदार मुरकुटे– ससाणे विरूद्ध माजी आमदार कानडे–ससाणे अशा झालेल्या लढतीत मुरकुटे –ससाणे गटाला ८ जागा मिळाल्या तर कानडे–ससाणे गटाला सात जागांवर समाधान मानावे लागले. परंतू उपसरपंच निवडीत मुरकुटे–ससाणे गटाचे गीरीष मते यांना आठ तर कानडे–ससाणे गटाचे सागर आहेर यांना सरपंचांसह ८ मते मिळाली. समसमान मते मिळाल्याने सरंपच यांना असलेल्या एक मताच्या अधिकारात सागर आहेर यांची सरशी होवून ते उपसरपंच झाले होते. त्याच वेळी दरवर्षी रोटेशन पद्धतीने उपसरपंच पदाची संधी देण्याचे ठरलेले होते, त्यानुसार सागर आहेर यांनी थोडे उशीरा का होईना पण उपसरपंच पदाचा राजीनामा दिला आहे.

कानडे–ससाणे गटाचे उपसरपंच सागर आहेर यांनी दिलेल्या राजीनामा नोटिशीवर मुरकुटे ससाणे गटाचे काळू गायकवाड व गिरीष मते हे साक्षीदार आहेत. ग्रामपंचायतीच्या नुकत्याच पार पडलेल्या मासिक बैठकीत सरपंच शितल पटारे व ग्रामविकास अधिकारी प्रदीप ढुमणे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार राजीनामा व राजीनाम्याबाबत विवाद, राजीनामा अमलसत येणे इत्यादीची तरतुदींची माहीती देत पडताळणी करून सर्वानुमते वरिष्ठांकडे अहवाल पाठविण्याचे ठरवत त्यास मंजूरी देत पुढील कारवाई सुरू केली.

यावेळी, मयूर काळे, हिराबाई खंडागळे, आप्पासाहेब जाधव, सिमा विधाटे, संगीता अभंग, गीरीष मते, संजीवनी काळे, संदीप गांधले, मिना आबुज, विजय अमोलीक, काळू गायकवाड, ज्योती डूकरे आदी सदस्य उपस्थित होते तर या बैठकीस छाया आहेर व माया राक्षे या दोन महिला सदस्य गैरहजर होते. येत्या आठवड्यात उपसरपंच पदाची निवड होणार आहे.

# वैजापूरच्या न्यायालय परिसरातच तुंबळ हाणामारी



**वैजापूर (प्रतिनिधी)–** वैजापूर न्यायालय परिसरातच वाद घालत तुंबळ हाणामारीची झाल्याची घटना काल दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी वैजापूर पोलिसांत मारहाण करणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भगिनाथ नामदेव जगताप, दीपक भगिनाथ जगताप, जालिंदर नामदेव जगताप सर्व राहणार भऊर अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघा संशयितांची नावे आहे. या घटनेबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार भगिनाथ व जालिंदर हे दोघे सख्खे भाऊ आहे.त्यांचा वैजापूर न्यायालयात जमिनीच्या वादाबाबत केस सुरू आहे. शुक्रवारी दुपारी केस प्रकरणात ते न्यायालयात आले असता तिघांमध्ये न्यायालयाच्या गेट समोरच वाद झाला.त्यातच तिघांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. ही बाब लक्षात येताच कोर्टात उपस्थित पोलिस कॉन्स्टेबल भोजने, कामोदकर,बावचे, राजपूत यांनी तातडीने भांडण सोडवत तिघांना ताब्यात घेतले. या प्रकारात तिघांविरुद्ध सार्वजनिक ठिकाणी हाणामारी करून शांतता बिघडून दंगल केल्याप्रकरणी वैजापूर पोलिसांत पोलिस कॉन्स्टेबल संभाजी भोजने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चिलेखनवाडीत वृद्ध व्यक्तीला जीवे ठार मारण्याची धमकी

**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** रस्त्यावर असलेली टपरी बौद्ध विहाराच्या जागेत मागे घेत असताना टपरीधारकाला समजून सांगण्याचा प्रयत्न केला असता, ९१ वर्षीय वृद्ध व्यक्तीला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी चिलेखनवाडी येथील चार जणांवर नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रभाकर अर्जुन खंडागळे (वय ९१) यांनी नेवासा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, दि. ०७ रोजी सकाळी ०८:३० वाजेच्या सुमारास चिलेखनवाडी येथे बौध्द विहारसमोर उभे असताना संतोष तागड, वर्षा संतोष तागड यांच्यासह इतर २ जण (सर्व रा. अंतरवली) तेथे आले व त्यांची रोडलगतची टपरी ही मागे बौध्द विहारच्या जागेत उभी करत असताना, मी त्यास म्हणालो की, तुम्ही टपरी मागे घेवू नका, ही जागा बौध्द विहार हद्दीतील आहे. असे समजावून सांगत असताना त्याचा राग येवून त्यांनी मला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रस्त्यावर बोअरवेल घेण्याचा प्रयत्न

## माणिक चौकातील प्रकार; संबंधितांवर गुन्हा दाखल होणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी) –** शहरातील माणिक चौकात रस्त्यावरच गुरूवारी रात्री साडेअकरा वाजता बोअरवेल घेण्याचा काही लोकांनी प्रयत्न केला. महापालिकेच्या पथकाने ते बोअरवेल घेण्याच काम अर्धवट थांबविले. यासंदर्भात संबंधित व्यक्तींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

आयुक्त डांगे यांनी पदभार स्वीकारल्यापासून शहरातील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम व्यापक केली. त्यामुळे स्टेशन रस्ता, माळीवाडा, दिल्लीगेट, झेंडीगेट परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आली. तसेच, अनाधिकृत फलक लावणाऱ्याविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, गुरूवारी रात्री शहरातील माणिक चौक, चाँद सुलताना हायस्कूल परिसरात काही व्यक्ती रस्त्यावरच बोअरवेल घेत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आयुक्त डांगे यांनी पोलिसांसह मनपा कर्मचारी पथक घटनास्थळी पाठविले. त्या बोअरवेलचे काम बंद करून ते बुजवून टाकण्यात आले. दरम्यान, संबंधित व्यक्तीविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### उद्योग, सेवा क्षेत्रात महाराष्ट्राची...

येत्या सोमवारी (१० मार्च) राज्याचा सन २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आज सादर झालेल्या आर्थिक पाहणी अहवालात उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या वाढीत झालेली घट तसेच सरकारच्या महसुली जमेपेक्षा खर्चात झालेली तब्बल २० हजार कोटींची वाढ झाल्याने सरकारची चिंता वाढली आहे.

अर्थसंकल्पीय अंदाजानुसार २०२४-२५ या वर्षात राज्याची महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित असून प्रत्यक्षात जानेवारी २०२५ पर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा ३ लाख ८१ हजार ८० किती असून ही जमा अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७६.३ टक्के आहे. निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारच्या लोकनुयायी घोषणांमुळे राज्याचा महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये अपेक्षित आहे. राज्याच्या कर्जात गेल्या वर्षीच्या तुलनेत १०.१ टक्के वाढ अपेक्षित असून मार्च २०२५ अखेर राज्यावरील कर्जाचा बोजा ७ लाख ८२ हजार ९९१ कोटीवर पोहचण्याचा अंदाज आहे. गेल्यावर्षी मार्च २०२४ अखेर कर्जाचा आकडा ७ लाख ११ हजार २७८ कोटी रुपये इतका होता. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात कर्ज ७०हजार कोटींनी वाढले आहे. कर्जावरील व्याज फेडण्यासाठी यंदा ५६ हजार ७२७ कोटींचा खर्च होणार आहे. गेल्या वर्षी व्याजाच्या परतफेडीसाठी ४८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा खर्च वाढल्याने भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट होत आहे. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट २.४ टक्के तर महसुली तूट ०.४ टक्के असणार आहे.

राज्यात २०२४ मध्ये सरासरीच्या ११६.८ टक्के पशु झाला. २०२४-२५ च्या खरीप हंगामात १५७.५९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ४९.२ टक्के, ४८.१ टक्के, २६.९ टक्के, आणि १०.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. तर ऊस उत्पादनात गेल्या वर्षीच्या तुलनेत ६.६ टक्क्यांनी घट अपेक्षित आहे. २०२४-२५ च्या रब्बी हंगामात तृणधान्य आणि कडधान्य उत्पादनात अनुक्रमे २३ आणि २५ टक्के वाढ अपेक्षित असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**कृषी वित्त पुरवठ्यात आखडता हात**

शेतक-यांना विविध बँका आणि सहकारी संस्थांमार्फत पुरवठा करण्यात येणारे अल्प मुदत पीक कर्ज आणि कृषी मुदत कर्जात हात आखडता घेण्यात आला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ४४ हजार ६२१ कोटी रुपयांचा कमी कर्जपुरवठा करण्यात आला आहे. २०२४-२५ साठी ७.१७ लाख कोटींचा वार्षिक कर्ज आराखडा तयार करण्यात आला आहे. २०२३-२४ मध्ये अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी ३२,१२४ कोटी तर २०२४-२५ मध्ये १८,६३३ कोटी पीक कर्ज वाटप केले आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकांनी ४ हजार ६१७ तर २०२४-२५ मध्ये ३,६१५ कोटी रुपये, जिल्हा बँकांनी २०२३-२४ मध्ये २३ हजार ४५४ कोटी तर २०२४-२५ मध्ये १८,५३० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. २०२३-२४ मध्ये ६०,१९५ आणि २०२४-२५ मध्ये ४० हजार ७७८ कोटी रुपयांचे पीक कर्जवाटप करण्यात आले आहे.

**सिंचनाची टक्केवारी गुलदस्त्यात**

सिंचन घोटाळ्याचे आरोप आणि त्याची चौकशी होऊन जवळपास १५ वर्ष उलटली तरी राज्यातील सिंचनाची टक्केवारी देण्यात राज्य सरकारकडून टाळाटाळ केली जात आहे. सन २०१२ पासूनच्या आर्थिक पाहणी अहवालात राज्यातील सिंचनाची टक्केवारी दिली जात नाही. यावर्षीच्याही अहवालातही आकडेवारी गुलदस्त्यात आहे. मात्र, राज्यातील मोठ्या, मध्यम, आणि लघु पाटबंधारे प्रकल्पांद्वारे जून २०२३ अखेर ५६.६३ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. सन २०२३-२४ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ३९.२७ लाख हेक्टर होते, या सिंचित क्षेत्रात २०२२-२३ च्या तुलनेत घट झाली असून गेल्यावेळी सिंचित क्षेत्र ४२.३३ लाख हेक्टर इतके होते.

**आर्थिक पाहणी अहवालाची वैशिष्टे**

राज्याच्या वार्षिक योजनेचा सन २०२४-२५ या वर्षाचा नियतव्यय १ लाख ९२ हजार कोटी रुपये असून त्यापैकी जिल्हा वार्षिक योजनेचा नियतव्यय २३ हजार ५२८ कोटी रुपये इतका आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत डिसेंबर २०२४ पर्यंत २ कोटी ३८ लाख महिलांना १७ हजार ५०५ कोटी ९० लाख रुपयांचे वाटप.

जानेवारी ते मे २०२४ दरम्यान पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या ४ लाख ९५ हजार शेतकऱ्यांना ७९७ कोटी तर जून ते सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी आणि पूरबाधित ३७ लाख ६७ हजार शेतकऱ्यांना १ हजार ४७० कोटी रुपयांची मदत.

### मुलींना सर्व्हाईकल कॅन्सरची...

सहभाग घेतला. यावेळी बोलताना ते म्हणाले, काहीही बातम्या येऊ द्या, लाडकी बहिण योजना सुरूच राहिल. बहिणींना शासनाच्या वतीने ही मदत मिळत राहील, अशी ग्वाही त्यांनी पुन्हा एकदा दिली. आम्ही बहिणींना पैसे देतो त्याच्या योग्य विनियोग झाला पाहिजे यासाठी आम्ही त्याचीही योजना आम्ही तयार केली आहे. भविष्यात यातून बहिणींना व्यवसाय उभा करता येईल. त्यातून त्यांना फायदा होईल अशी योजना आखली आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

भाजप आमदार मनीषा चौधरी यांनी यावेळी महिलांच्या आरोग्यावरील खर्चात सरकारने वाढ करण्याची मागणी केली. तर महिलांसाठी राज्य सरकारने खास उद्योग, व्यवसाय धोरण निर्माण केले पाहिजे, अशी मागणी आमदार श्वेता महाले यांनी केली. आमदार सरोज आहेर यांनी शालेय अभ्यासक्रमात शिवचरित्र नावाचा विषय समाविष्ट करावा, अशी मागणी केली. तर आमदार ज्योती गायकवाड यांनी लाडक्या बहिणींना लवकरात लवकर २ हजार १०० रुपये देण्यात यावेत, अशी मागणी केली.

**चर्चेकडे पाठ**

दरम्यान, विधानसभेतील महिलांच्या विषयावरील विशेष चर्चेकडे महिला आमदारांसह इतर आमदार आणि मंत्र्यांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. १९ महिला आमदारांपैकी मोजक्याच महिला आमदारांनी चर्चेत भाग घेतला.

### जिल्ह्यातील गट, गणांच्या...

नवीन ग्रामपंचायतींची स्थापना होणे, त्यांचा समावेश इतर तालुक्यात होणे, जिल्ह्यातील किंवा तालुक्यातील काही गावांचा समावेश इतर जिल्ह्यात किंवा तालुक्यात होणे या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकसंख्येच्या रचनेत बदल होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९ (१) अन्वये जिल्हा परिषदेची रचना करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ५७ (१) व ५८ अन्वये पंचायत समितीची रचना करण्यात आलेली आहे. सदर कलमातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद सदस्यांच्या प्रत्येक गटातील निवडणूक विभागाचे पंचायत समितीच्या दोन गणांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. यामुळे जिल्हा परिषद सदस्यांच्या संख्येत वाढ झाल्यास पंचायत समिती सदस्यांची देखील वाढ होणार आहे. या माहिती अभ्यास करण्यासाठी येत्या आठ दिवसांत जिल्ह्यात ग्रामीण भागाचा शहरी भागात किंवा शहरी भागाचा ग्रामीण भागात समाविष्ट झालेला आहे का?, जिल्ह्यातील व तालुक्यातील काही गावांचा समावेश इतर जिल्ह्यात किंवा तालुक्यात झालेला आहे का? नवीन गट ग्रामपंचायतची विभाजन होऊन स्वतंत्र ग्रामपंचायत अस्तित्वात आलेली आहे का? पुनर्वासनामुळे नवीन गावाची अथवा ग्रामपंचायतीची निर्मिती झालेली आहे का? ग्रामीण लोकसंख्येत काही बदल झालेले आहे का? याबाबतचा तपशील ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडे मागितला आहे.

**ग्रामीणचा तपशील मागवला**

ग्रामीण आणि शहरी क्षेत्रातील लोकसंख्या आणि प्रशासनिक पुनर्रचनेबाबत सविस्तर माहिती संकलित करण्याचे आदेश दिले आहेत. आदेशानुसार, तालुका आणि पंचायत समितीचे नाव, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व जमातींची लोकसंख्या, गाव, वाड्या–वस्त्या तसेच अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित भागांची माहितीही मागविण्यात आली आहे. २०११ नंतर ग्रामीण क्षेत्रात झालेल्या बदलांचा तपशील व अन्य मुद्याची माहिती सादर करावी लागणार आहे.

### श्रीरामपुरातील विस्थापितांचे...

बैठकीत श्रीरामपूर तालुक्याचे आमदार हेमंत ओगले, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, अनुराधा आदिक, सचिन गुजर, संजय छल्लारे, प्रकाश चित्ते, सिद्धार्थ मुरकुटे यांनी केली होती. त्यांच्या विनंतीला मान देऊन तालुक्यातील सहकारी पतसंस्थांनी हा निर्णय घेतला आहे.

श्रीरामपूर शहरातील विविध सहकारी पतसंस्थांचे अतिक्रमणामुळे अडचणीत आलेले कर्जदार देखील या वेळी उपस्थित होते. श्रीरामपूर शहरातील सहकारी पतसंस्थांनी घेतलेल्या या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन काका कोयटे, श्रीरामपूर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष वासुदेव काळे, अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुशीलाताई नवले आदींसह अतिक्रमण धारकांची बाजू मांडणाऱ्या मान्यवरांचे व तालुक्यातील सहकारी पतसंस्थांचे आभार मानले.

### श्रीगोंद्यात चार बांगलादेशी...

वैध कागदपत्रांशिवाय वास्तव्यास असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकास मिळाली होती. त्यानुसार पथकाचे सहायक पोलीस निरिक्षक दत्तात्रय नलावडे, पोलिस उपनिरिक्षक सुखदेव मुरकुटे, सहायक फौजदार राकेश खेडकर, हवालदार अनिल गोरे व श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे सहायक सहायक निरिक्षक गणेश अहिरे, सहायक फौजदार भगवान गांगर्डे, प्रमिला उबाळे, योगेश भापकर, होमगार्ड विशाल गोरखे, महिला होमगार्ड दिपाली मोटे यांनी पंचासह यू प्रशांत हॉटेलवर छापा टाकला व चार बांगलादेशी घुसखोर महिलांना अटक केली. या महिला न्यू प्रशांत हॉटेल येथे काम करुन तेथेच राहत होत्या. त्यांच्याकडे रेडमी, ओपो मोबाईल, आधार कार्ड, पॅन कार्ड, युनियन बँकेचे डेबीट कार्ड, एनएक्सजी, आयफोन, हवाई कंपनीचा मोबाईल असे साहित्य आढळले आहे. आयएमओ अॅपद्वारे बांग्लादेशातील नातेवाईकांशी त्या संपर्क साधत होत्या. त्यांच्या मोबाईलमधील कॉन्टेक्ट लिस्टमध्ये बांग्लादेश येथील कंन्ट्री कोड +८८० असा क्रमांक असलेले नंबर आहेत. अधिक तपास सुरू आहे.

### तलाठ्यासाठी स्विकारली...

स्विकारताना त्यास रंगेहाथ पकडण्यात आले.

आपला एजंट पकडल्या गेला असल्याची माहिती मिळताच, तलाठी धनंजय पऱ्हाड पसार झाला आहे. याप्रकरणी कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात शुक्रवार दि. ७ मार्च रोजी सकाळी सहा वाजता फिर्याद दाखल झाली आहे. या फिर्यादीवरून तलाठी धनंजय पऱ्हाड व सागर चौधरी याच्या विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम ७, ७ (अ), १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक छाया देवरे या करीत आहेत.

### नूतन जिल्हाधिकारी...

म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी डॉ. आशिया जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त, नाशिक जिल्ह्यातील कळवण येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. डॉ. आशिया यांच्या भारतीय प्रशासकीय सेवेची सुरुवात यवतमाळ जिल्ह्यातून झाली आहे. या सेवेत आल्यानंतर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीत आर्णी येथे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, तहसीलदार व बाभुळगाव येथे गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.

### नादुरूस्त विद्युत रोहित्रे...

वीज योजना सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत शासन निर्णय अन्वये २०२३-२४ मध्ये रु.२०० कोटी इतका निधी रोखीने व१०० कोटी रूपये इतका निधी पुर्नविनियोजनाने महावितरण कंपनीस वितरीत करण्यात आला आहे. २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता निरंतर वीज योजनेअंतर्गत ग्राहकांना अखंडीत आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्याकरिता १५ वर्षापेक्षा जास्त जुने व तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम असलेले विद्युत रोहित्रे बदलण्याकरिता रु.४८० कोटी व विद्युत रोहित्रांचे ऑईल बदलण्याकरिता रु.१२० कोटी असे एकूण६०० कोटी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे. सन २०२४-२५ करिता निरंतर वीज योजनेअंतर्गत५५० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून त्यापैकी वित्त विभागाच्या मान्यतेने३३० कोटी इतका निधी समायोजनाने शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे. आता वित्त विभागाच्या मान्यतेने सदर योजनेंतर्गत उर्वरित निधी२२० कोटीपैकी१००कोटी निधी महावितरण कंपनीस रोखीने वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

निरंतर वीज योजनेअंतर्गत ग्राहकांना अखंडीत आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्याकरिता १५ वर्षापेक्षा जास्त जुने व तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम असलेले विद्युत रोहित्रे बदलण्याकरिता रु.१००,००,००,०००/- (रुपये शंभर कोटी फक्त) इतका निधी महावितरण कंपनीस रोखीने वितरित करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

### शिर्डी शहरातील अवजड वाहतूक...

स्वागत कक्ष (बसस्थानकासमोर) ते अहिल्यानगर–मनमाड हायवे जुने कब्रस्तानपर्यंतची वाहतूक १२ नंबर चारीरस्ता ते १८ मीटर रिंगरोडपर्यंत, प्रसादालय रोड (पोलीस स्टेशनपासून) ते विद्यूत विभाग, महावितरण कार्यालयपर्यंतची वाहतून शासकीय विश्रामगृहाच्या बाजुचा हेलीपॅड रोड ते विद्यूत विभाग, महावितरण कार्यालयापर्यंत, एअरपोर्ट रोड चौक (फायर स्टेशन पासून) ते खंडोबा कॉम्पलेक्स (अहिल्यानगर–मनमाड हायवेपर्यंत) ची वाहतूक एअरपोर्ट रोड चौक (फायर स्टेशनपासून) ते १८ मीटर रिंगरोडने आर.बी.एल. बँक चौक व हॉटेल ऋषिकेश तर कनकुरी रोड श्रीराम चौक ते नगर परिषद कार्यालय (अहिल्यानगर–मनमाड हायवेपर्यंत) ची वाहतूक कनकुरी रोड श्रीराम चौक मार्गे ते १८ मीटर रिंगरोडने आर.बी.एल. चौक व हॉटेल ऋषिकेशपर्यंत या पर्यायी मार्गे वळविण्यात आली आहे.

### अहिल्यानगरला १५ मार्चपासून...

प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्टच्या वस्तू याशिवाय अनेक प्रकारच्या ज्वेलरी, लहान मुलांसाठी लाकडी खेळणी व इतर जिल्हातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल असणार आहे. या ठिकाणी प्रमाणित असे सेंद्रिय पदार्थ प्रदर्शनात उपलब्ध होणार आहेत. यामध्ये जिल्हातून ९८ वस्तू आणि इतर जिल्हातून साधारण ४० वस्तू स्टॉल असणार आहेत. याशिवाय नाशिक विभागाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुगरणीचे खमंग आणि रुचकर शाकाहारी खाद्यपदार्थांचे ७६ स्टॉलचे भव्य असे फूड कोर्ट असणार आहे. नगरकरांच्या विशेष पसंतीच्या असलेल्या या भव्य प्रदर्शनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन शहरी नागरिकांना होणार आहे. हे प्रदर्शन प्रशस्त मोकळ्या पटांगणात असून अहिल्यानगर शहरातील नागरिकांना प्रदर्शनाचा आरामदायी अनुभव घेता येणार आहे. तो घेण्यासाठी सर्व महानगरातील नागरिकांनी अवश्य भेट देण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी केले आहे.